# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५

## (सकाळी १०:०० ते ११:४५ वाजता)

(क) : **(मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५, बुधवार, दिनांक १२ मार्च, २०२५ व सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर**, हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.मनिषा कायंदे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री कृपाल तुमाने, श्रीकांत भारतीय, अमोल मिटकरी, किशोर दराडे, निरंजन डावखरे, किरण सरनाईक, पंकज भुजबळ, राजहंस सिंह, शिवाजीराव गर्जे, योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील, सदाशिव खोत, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, सर्वश्री अमरीशभाई पटेल, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"हे राज्य लोकांचे आहे आणि लोकांसाठी आहे" ही भावना मनामध्ये ठेवून महायुतीचे शासन वेगाने कार्यरत असणे, मुंबई-पुणे व एमएमआरडीएसह राज्यातील अन्य छोट्या शहरांमध्ये स्टार्टअपची संख्या वाढत असल्याने इंडिया स्टार्टअपनी घोषित केलेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र हे स्टार्टअपचे देशातील पहिल्या क्रमाकांचे राज्य ठरले असणे, महायुती शासनाने महाराष्ट्रात अशक्य वाटणारा समृध्दी महामार्ग कार्यान्वित केला असणे, या महामार्गामुळे मुंबई-पुण्यात होणारी गुंतवणूक धुळे, गडचिरोली, नागपूर, अमरावती या भागात वाढत असल्याचे निदर्शनास येणे, नागपूर-गोवा शक्तीपीठ द्रुतगती मार्गाचे बांधकाम हाती घेण्याचा निर्णय घेतला असणे, या द्रुतगती मार्गामुळे, त्या मार्गावरील प्रमुख धार्मिक क्षेत्रे व तिर्थस्थळे जोडण्याचे प्रयोजन असून या प्रदेशातील आर्थिक विकासाला देखील चालना मिळू शकेल, राज्याच्या शहरी भागात पायाभुत सुविधांद्वारे शहरी जीवनमान

सुधारण्यासाठी 'नगरोत्थान महाभियान' प्रभावीपणे राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत पाणी पुरवठा, मलःनिस्सारण व विकास यांचे सुरु असलेले प्रकल्प दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असणे, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने या शहरामध्ये गृहनिर्माण व गतीमान परिवहन हे मुद्दे प्राधान्याने विचारात घेऊन स्मार्ट सिटीच्या माध्यमातून स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाचा प्रयत्न असणे, मेट्रो-२ ए आणि २ बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसरच्या मध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचे प्रवास सुखकर झाल्याचे दिसून येणे, ठाणे-बोरीवली भुयारी मार्गाची निर्मिती करण्याचे धोरण प्रस्तावित असणे, मुंबई-पुणे मिसिंग लिंक या ६७०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, वर्सोवा-वांद्रे सागरी सेतुची निर्मिती, शिवडी ते न्हावाशेवा या मुंबई पारबंदर प्रकल्पाची निर्मिती जलदगतीने सुरु असणे, मुंबईतील कुर्ला येथील नेहरूनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाली नसल्याचे निदर्शनास येणे, या गृहनिर्माण वसाहतींसाठी लागू केलेल्या अभय योजनेची मुदत वाढविण्याची आवश्यकता, कुर्ला येथील रेल्वे हद्दीतील संतोषी माता नगर, साबळे नगर व क्रांतीनगर येथे अनेक वर्षे राहणाऱ्या झोपडीधारकांना रेल्वे प्रशासनामार्फत पर्यायी जागा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता, नेहरूनगर येथील म्हाडाच्या वसाहतीत राहणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना माफक दरात निवासस्थाने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, राज्यभरात ४०९ नागरी समुहांमध्ये 'प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)' राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत २ लाखांपेक्षा अधिक घरे बांधण्यात आली असून, १ लाख ८५ हजारांपेक्षा अधिक घरांचे बांधकाम प्रगतीपथावर असणे, मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण झाल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था तातडीने दूर करण्याची आवश्यकता, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था व वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभुत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, जुन्या चाळींची व्याख्या बदलून हेरिटेज टिडीआर प्रत्यक्ष अंमलात आला असणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता

अग्रिम प्रत

देण्यात येणे, मुंबईतील जुन्या इमारतींच्या स्वयंपुनर्विकासाकरिता मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणाऱ्या कर्ज मर्यादेत वाढ करण्यात आली असल्याने गृहनिर्माण प्रकल्प वेगाने उभे रहात असल्याचे निदर्शनास येणे, मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी स्टॅम्प डयुटी भरण्यात सुलभता होण्यासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना सुरु करण्यात येणे, झोपडपट्टी पुनर्वसन मधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यात ५१ लाख घरे बांधण्याचे प्रस्तावित असणे, ठाणे शहरात एमआयडीसीच्या अभिन्यासातील १५०० हेक्टर भूखंडावर जगातील सर्वात मोठा क्लस्टर प्रकल्प राबविण्यात येणे, समूह विकास पध्दतीने हा प्रकल्प राबविण्याचे प्रयोजन असणे, वाशी येथील सध्याच्या दोन खाडी पुलांना समांतर अशा तिसऱ्या सहा पदरी खाडी पुलाच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, नवी मुंबई विमानतळामुळे वाढणाऱ्या लोकसंख्येसाठी नियोजित 'नैना' प्राधिकरणामार्फत २३ गावांच्या नियोजित आराखडयाच्या अंमलबजावणीस गती देण्याची आवश्यकता, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या मोठ्या शहराचा मेगापॉलिस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन जागतिक पटलावरचे हे महानगर त्याच उच्च दर्जाचे व्हावे व येथील प्रत्येक कुटुंबात सुख आणि समाधान नांदावे ही या शासनाची महत्वाकांक्षा असणे, मुंबई व एमएमआरडीए क्षेत्रातील घरांची समस्या, वाहतुक समस्या इ. चे गतीमानतेने निर्मूलन करून मुंबईचा पर्यावरणपूरक विकास करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) : **(सोमवार दिनांक १७ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** —

"शासनाच्या दिशाहीन धोरणांमुळे शहर आणि ग्रामीण भागातील महत्त्वाची विकासकामे रखडली असून, विविध योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात अपारदर्शकता आणि आर्थिक गैरव्यवहार झालेले असणे, राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या

अग्रिम प्रत

निवडणूका रखडल्यामुळे अनेक विकासकामे प्रलंबित असून प्रशासकीय अधिकाऱ्यांचा अनेक कामांमध्ये वाढलेला हस्तक्षेप, विरोधी पक्षांच्या लोकप्रतिनिधिंना निधी देताना मिळत असलेला दुजाभाव, राज्यातील स्मार्ट सिटी योजनांचा वेग अत्यंत संथ असून निधी मंजुरीस विलंब होत असणे, अनेक प्रकल्प कागदावरच राहिले असणे, महानगरपालिका आणि नगरपालिका स्तरावर कचरा व्यवस्थापनासाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर केला जातो, पण प्रत्यक्षात त्याचा योग्य वापर न करता भ्रष्टाचार केला जात असणे, अनेक शहरांमध्ये रस्ते खोदकाम सुरूच असणे, पण दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण होत नसणे, ड्रेनेज लाईनसाठी मंजूर केलेले प्रकल्प अपूर्ण असणे, परिणामी शहरांमध्ये पावसाळ्यात पाणी साचण्याचे प्रमाण वाढले असणे, स्मार्ट सिटी अंतर्गत मंजूर रस्ते व पूल अपूर्ण असल्यामुळे अनेक ठिकाणी पूल आणि उड्डाणपूल (फ्लायओव्हर) वर्षानुवर्षे अपूर्ण असून त्यामुळे होत असलेली वाहतूक कोंडी, प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) आणि राज्य सरकारच्या घरकुल योजनांचे अनुदान लाभार्थ्यांना वेळेवर मिळत नसणे, घरकुल प्रकल्प रखडले असून अनेक कंत्राटदारांनी कामच बंद केले असणे, म्हाडा आणि सिडकोच्या घरवाटप प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अपारदर्शकता असून, सामान्य नागरिकांना परवडणाऱ्या घरांसाठी प्रचंड अडचणी येणे, मोठ्या विकासकांना फायदा मिळवून देण्यासाठी नियमांचे उल्लंघन होत असणे, अनेक झोपडपट्ट्या व जुन्या चाळी तसेच सोसायट्यांचे पुनर्विकास प्रकल्प फसव्या विकासकांमुळे रखडले असणे, रहिवाशांना तात्पुरत्या जागांमध्ये हलवून त्यांना पुन्हा घर मिळत नसणे, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना आणि राज्यस्तरीय रस्ते योजना रखडल्या असणे, अनेक गावांना जोडणारे रस्ते अजूनही खराब अवस्थेत असून मंजूर निधीचा उपयोग होत नसणे अनेक गावांमध्ये अद्याप पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे, टँकर माफियांना फायदा होईल, यासाठी पाणीपुरवठा योजना रखडवल्या जात असणे, गाव तिथे रस्ता ही संकल्पना पुर्णत्वास आली नसल्याने अनेक गावांपर्यंत अद्यापही पक्के रस्ते पोहोचलेले नसणे, पाणंद रस्ते निधी अभावी प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागणे, परिवहन विभाग व अखात्यारित असलेले महामंडळे यामध्ये सुरु असलेली अनियमितता व गैरव्यवहार, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

# (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **मुख्यमंत्री** : महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** : "मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

(१) **ॲड.अनिल परब, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"अंधेरी पूर्व येथील शेर-ए-पंजाब कॉलनीत गुरुद्वारासमोर मध्यरात्री १२.३० च्या सुमारास दिनांक ८ मार्च, २०२५ रोजी वा त्या सुमारास रस्त्याच्या मधोमध असलेल्या महानगर गॅस पाईपलाईनच्या लिकेजमुळे आगीचा भडका उडाल्याची घटना."

(२) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ६** वर **सांस्कृतिक कार्य मंत्री** निवेदन करतील :-

"महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचा व्यापक प्रचार आणि स्मृती जतन करण्याबाबत."

अस्वाक्षरित प्रत

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ] —**

(१) **श्री.सचिन अहिर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील भूमाफियांकडून डी, इ, जी-दक्षिण, एच-पश्चिम, के-पश्चिम, पी-उत्तर व पी-दक्षिण व एल प्रभाग क्षेत्रात मोक्याच्या ठिकाणावरील शासकीय तसेच खाजगी जमिनींवर अनधिकृत इमारतींची बांधकामे मोठ्या प्रमाणात होत असणे, जी-दक्षिण या प्रभागात सन २०२२ ते २०२४ या कालावधीत २०८ अनधिकृत बांधकामांना नोटीस बजावण्यात आली असून देखिल अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नसणे, पी-दक्षिण, पी-उत्तर या प्रभागात भूमाफियांनी शासनाच्या सुमारे १५० एकर जागेवर भरणी टाकून अतिक्रमण केलेले असणे, यामुळे शासनाचे कोट्यवधी रूपयांचा महसूल बुडणे, अशा अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारतीमध्ये घर घेऊन फसवणूक झालेल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अशा प्रकरणांमध्ये न्यायालयात दाद मागण्यासाठी धाव घेण्याची नागरिकांवर आलेली वेळ, तसेच स्थानिक नागरिकांच्या पाणी, विज, रस्ते यासारख्या मुलभुत सुविधांवर येणाऱ्या ताणामुळे नागरीकांचे होणारे प्रचंड हाल, रस्ते वाहतुकीवर होणारा परिणाम, शासनाचे मोठ्या प्रमाणात होणारे महसूली नुकसान, याबाबत जनतेत प्रचंड प्रमाणात असलेला आक्रोश, यामुळे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती उद्‌भवण्याची भिती, याबाबत लाईफ इन लाईट या स्वयंसेवी संस्थेने तथा स्थानिक नागरीकांनी महानगर पालिकेकडे वारंवार केलेल्या अनेक तक्रारी, याकडे महानगरपालिका आयुक्त, संबंधित झोनचे उपायुक्त, डी.ओ., वॉर्ड ऑफिसर, कार्यकारी अभियंता या सर्व अधिकाऱ्यांचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

अप्रकाशित मत

(२) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे येथील निकमार युनिर्व्हिसिटी येथील रजिस्ट्रार यांची पीएचडीची पदवी बोगस असल्याचे माहे मार्च,२०२५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास येणे, सदर पदवी राजस्थानच्या जोधपूर नॅशनल युनिर्व्हसिटीमधील असल्याचे निदर्शनास येणे, या विद्यापीठाच्या बाबतीत अनेक तक्रारी असून राजस्थान पोलिसांच्यावतीने २६ हजार ५०६ पदव्या खोटया म्हणून घोषित करणे, शैक्षणिक वर्ष २०१५ ते १७ या दोन वर्षात एकूण १५०९ पदव्या बोगस घोषित करण्यात येणे, याप्रकरणी एडीजी पोलिस, एटीएस आणि एससोजी राजस्थान यांच्यामार्फत कार्यवाही होणे, सदर प्रकरणी विद्यार्थी आणि कौन्सिल मेंबर यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार रजिस्ट्रार यांची पदवी शैक्षणिक वर्ष २०१५ ते १६ या वर्षातील असणे, या बॅचच्या पदव्या बोगस म्हणून घोषित करण्यात आलेल्या असणे, त्यामुळे रजिस्ट्रार यांच्या पदवीची चौकशी होऊन कारवाई व्हावी, अशी मागणी होत असतानाही शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, सबब, शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.राजहंस सिंह**, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहर व उपनगराला सध्या होत असलेला पाणीपुरवठा अपुरा पडत असल्याची गंभीर बाब समोर येणे, मुंबई शहर व उपनगराला मोडकसागर, तानसा, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा, तुळशी, विहार व भातसा या सात धरणांच्या माध्यमातून दररोज ३८५० दशलक्ष लिटर पाणी पुरवठा केला जात असणे, वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेमध्ये या सात धरणांमधून होत असलेला पाणी पुरवठा मुंबईकरांसाठी कमी भासत असणे, मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील ओगदे गावाजवळील गारगाई नदीवर येथील नियोजित गारगाई धरण प्रकल्प प्रस्तावित असणे, माधवराव चितळे

अप्रकाशित

समितीच्या शिफारसीनुसार पालिकेने गारगाई पाणीपुरवठा प्रकल्प हाती घेतलेला असणे, सदर नियोजित धरणाच्या माध्यमातून मुंबईला ४०० दशलक्ष लिटर पाणी पुरवठा होणार असल्याचे प्रस्तावित असणे, संबंधित विभागाकडून आवश्यक परवानगी मिळत नसल्याकारणाने सदर प्रकल्पाला गती मिळत नसणे, प्रस्तावित धरणासाठी जमीन अधिग्रहण व गारगाई नदीजवळील व प्रस्तावित धरणाच्या परिसरातील गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न व इतर समस्यांमुळे गारगाई प्रकल्प रखडत असणे, सदर प्रकल्पाच्या पूर्णत्वाने मुंबई शहर व उपनगरातील पाण्याचे गंभीर प्रश्न मार्गी लावण्यासाठी गारगाई पाणीपुरवठा प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.योगेश टिळेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे महानगरपालिकेने शहरातील पाणी पुरवठा योग्य प्रमाणात होण्यासाठी २०१८ मध्ये २४x७ योजना आणणे, या योजनेमध्ये ८५ पाणी साठवण टाक्या उभारून वितरण व्यवस्था करणे त्याचप्रमाणे सर्वांना समान पाणी वाटप नियोजन करणे या उद्देशाने ही योजना अस्तित्वात येणे, योजना सुरू होऊन सातवर्षानंतरही टाक्यांची काम अपुरी असणे, वितरण व्यवस्थेचे कामही अर्धवट असणे, पाण्याच्या टाक्या पूर्ण न भरल्याने नागरिकांना प्रेशरने पाणी न मिळणे, सिटी जवळील पाणी शुद्धीकरण अद्यापही पूर्ण न झाल्याने कात्रज कोंढवा येवलेवाडी पिसोळी या भागामध्ये पाणीपुरवठा अपुऱ्या प्रमाणात होणे, पुण्यासाठी २१ टीएमसी पाण्याची गरज असताना एवढे पाणी पुण्यासाठी न मिळणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या जायका प्रकल्पाची योजना २०१५ मध्ये मंजूर होऊन अद्यापही या प्रकल्पाची कामे सुरूच असणे, १९९७ मध्ये झालेल्या पाणी करारामध्ये साडेसहा टीएमसी पाण्यावर प्रक्रिया करून ते पुन्हा शेतीला सोडण्याचे बंधन महापालिकेवर घालूनही अध्यापही ते शक्य झालेले नसणे, त्यामुळे जलसंपदा विभागाकडून पुणे शहराला होणारा पाणीपुरवठा कमी प्रमाणात मिळणे, शहराचे पाणी नियोजन विस्कळीत झाल्यामुळे सर्व भागातून पाण्याच्या तक्रारी वाढत जाणे, शहरातील अनेक ठिकाणी पाण्याच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे नागरिकांनी आंदोलने करणे, हि योजना लवकरात लवकर पूर्ण करून पूर्णक्षमतेने पाणीपुरवठा सुरू होण्यासाठी शासनाने पुणे शहरातील लोकप्रतिनिधींची

अग्रिम प्रत

तातडीने बैठक घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाचे प्रतिक्रिया."

(५) **श्री.किरण सरनाईक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक १० ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार ०१ जून २०२४ पासून अंशतः अनुदानित शाळांना २० टक्के वाढीव टप्पा व घोषित शाळांना २० टक्के अनुदान टप्पा देय केलेले असणे, निर्णय निर्गमित होऊन चार महिने उलटूनही अंमलबजावणी झालेली नसणे, शासनाकडून अंमलबजावणीला विलंब होत असल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण होत असणे, दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याची गरज असणे, या निर्णयाची अंमलबजावणी करून दिनांक ०१ जून, २०२४ पासून अनुदान वितरणाची कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कन्नड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील गोडावून असलेल्या २९ गुंठे जागेचा भाडे पट्टा करार, कृषी उत्पन्न बाजार समितीने २०/०२/२०२५ रोजी काही व्यापाऱ्यांना करून देण्यात येणे, सदर जागा भाडे पट्टा करार करण्यासाठी बाजार समितीने मोठ्या प्रमाणावर जनजागृती न करता कमी खप असलेल्या दैनिकामध्ये जाहिरात देऊन मर्जीतील व्यापाऱ्यांना करार होण्यासाठी अप्रत्यक्षपणे मदत करणे, व्यापक प्रमाणात जनजागृती न झाल्याने बाजार समितीच्या या व्यवहारात शेतकरी व व्यापाऱ्यांना सहभागी होता आले नसणे, परिणामी, कमी भाडे पट्ट्यावर सदर जागा देण्यात येणे, त्यामुळे बाजार समितीचे मोठे आर्थिक नुकसान झालेले असणे, सदर जागेचे बाजार भावा प्रमाणे किंमत अंदाजे पंधरा कोटी असणे, परंतु बाजार समितीने सदर जागा आपल्या मर्जीतील व्यापाऱ्यांना अत्यल्प दरात करारावर देणे, सदर जागा भाडे करारनामा करण्यासाठी दिलेल्या मंजुरीस स्थगिती देणे बाबत दिनांक १३/०१/२०२५ रोजी बाजार समितीच्या १२ संचालकांनी सहाय्य निबंधक, सहकारी संस्था, कन्नड यांच्याकडे विरोध नोंदवुनही सदर करार करण्यात आलेला असणे, तद्नुषंगाने उक्त प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कारवाई

अग्रिम प्रत

करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री.इद्रिस नाईकवाडी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील गोरगरीब जनतेच्या आरोग्याची काळजी घेत सन २००९ साली शासनाने जीवनदायी आरोग्य योजना, सन २०१४ साली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, सन २०१७ पासून अस्तित्वात असलेली महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य, योजनेसाठी शस्त्रक्रियाचे दर सन २००६ साली Central Government Health Scheme अन्वये ठरवले गेल्यानंतर या दरात अल्पश: बदल सन २०२२ साली काही बाबीं पुरतेच करणे, ते वाढवून हृदय शस्त्रक्रियासाठी रु.०५ हजार ते २५ हजार पर्यंत वाढविण्यांत येणे, या योजनेतून प्रत्यक्षात रक्कम मंजूर झाल्यानंतर शस्त्रक्रियेवेळी अचानक काही तातडीची वैद्यकीय गुंतागुंताची आवश्यकता भासते, त्यामुळे खर्चात वाढ होऊन वाढीव खर्चाची रक्कम भरणेबाबत नातेवाईक यांना सांगण्यांत येणे, उदा.हृदय शस्त्रक्रिया करताना रुग्णास आवश्यकता भासली तर हेलियम गॅस लावावा लागणे, सिलेंडर रु. १०,०००/- (दहा हजार) बदलून घ्यावे लागणे, रुग्णांच्या नातेवाईकांची परिस्थिती नसल्याने रु. ६०,०००/- अचानक पैसे उभे करणे अशक्य असणे, रुग्ण दगावला तर ५०% च निधी दिला जाणे, परिणामी गरीब जनतेची आर्थिक परिस्थिती नसताना होणारा त्रास, यामुळे जनतेत पसरलेला असंतोष लक्षात घेता या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी हे दर सुधारित करणे, त्यासाठी समिती नेमण्याची आवश्यकता, ज्यात प्रत्यक्ष परिस्थिती हाताळणाऱ्या डॉक्टरांचा समावेश असण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **डॉ.मनिषा कायंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे, **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नाशिक महात्मानगरच्या पंड्या हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या गैरकारभार, हलगर्जीपणा आदि संदर्भात अनेक तक्रारी असणे, या रुग्णालयातील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे एका मागासवर्गीय नवजात

अग्रिम प्रत

बालकाचा व महिलेचा प्रसुत्ती व उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडणे, उक्त डॉक्टरांकडे Gynecologist ची पदवी नसतांना अवैधरित्या गर्भपात, प्रसुत्ती करणे, या रुग्णालयात मोठया प्रमाणात गैरप्रकार सुरु असून त्यातीलच हॉस्पिटलची नोंदणी, नुतनीकरण केलेले नसतांनाही हॉस्पिटल चालविणे, नुकत्याच पडलेल्या छाप्यामध्ये गर्भपाताच्या गोळयाचा साठा सापडणे, संगणकामध्ये रुग्णांची नोंद नसणे, स्टाफ, नर्स यांचा असलेला अभाव, डॉक्टरयांच्या कडून रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांचा होत असलेला पैश्याकरिता होत असलेला मानसिक छळ, रुग्णांना बेड देतांना प्रति बेड ३०००/- ते ७००० /- रुपयांची होत असलेली मागणी, कंत्राटी पध्दतीने डॉक्टरांच्या नियुक्त्या देतांना वरिष्ठांच्या नावाने पैश्यांची मागणी, डॉक्टर शासनाचे अधिकारी असून सेवा ज्येष्ठतेमध्ये ज्युनिअर असणे, पदे सांभाळण्यास पात्र नसणे, रुग्णालयांतील काही डॉक्टरांबाबत अनेक तक्रारी असतांनाही ते रुग्णालयांत कार्यरत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, गैर कारभार व हलगर्जीपणा करणाऱ्या या रुग्णालयातील डॉक्टरांना तात्काळ निलंबित करुन सखोल चौकशी अथवा अन्यत्र बदली करण्याची होत असलेली मागणी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका ."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## -मध्यंतर-

**सहा : सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सात : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

(१) **सर्वश्री सत्यजीत तांबे,** विक्रम काळे, किशोर दराडे, **वि.प.स.** यांची **म.वि.प.** नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —

"बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यात बोंडगाव, कालवड, कठोरा, भोनगाव, हिंगणा वैजनाथ, घुई या गावांमध्ये केसगळती होण्याची साथ पसरली असून या गावातील लोकांना डोक्याला आधी खाज येते. त्यानंतर हळूहळू केस गळू लागतात आणि तीन दिवसातच संपूर्ण टक्कल पडत आहे. त्यामुळे ग्रामस्थ भयभीत झाले आहेत, दाढीचेही केस गळत असल्याने गावकऱ्यांमध्ये दहशत निर्माण झाली आहे, यावर अनेक खाजगी संशोधक आणि संस्था यांनी केलेल्या संशोधनात या गावातील लोकांच्या

आहारात आलेल्या गव्हामध्ये सेलेनियमचे प्रमाण अधिक असल्याचा निष्कर्ष काढून जाहीर केला असून या गव्हाचे वितरण राज्यात अन्यत्र कोठे झाले आहे याचा तातडीने शोध घेऊन वितरण थांबवण्याची गरज आहे. तसेच टक्कल पडलेल्या लोकांना नुकसान भरपाई व पुढील उपचार देण्याची आवश्यकता तसेच यापुढे अशा गव्हाचे वितरण होऊ नये, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री श्रीकांत भारतीय**, अमित गोरखे, योगेश टिळेकर, **वि.प.स.** यांची **म.वि.प.** नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"कृत्रिम बुध्दिमत्ता अर्थात AI (Artificial Intelligence) ही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनत असून भविष्यात जागतिक स्तरावर त्याची व्याप्ती अधिक प्रमाणात वाढण्याची शक्यता निर्माण होणे, AI च्या वेगवान प्रवाहात टिकून राहण्याकरिता राज्यातील बऱ्याचशा शाळांमध्ये AI तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण पध्दतीचा वापर रोजच्या शिक्षणात करण्यात येत असणे, शिक्षण पध्दतीमध्ये AI तंत्रज्ञानाचा वापर केल्यास एका बाजुला शिक्षण प्रणालीत क्रांती घडण्याची तर दुसरीकडे योग्य धोरणांशिवाय या तंत्रज्ञानाचा वापर शिक्षण पध्दतीमध्ये केल्यास त्यामुळे अनेक धोके निर्माण होण्याची शक्यता, AI आधारित शिक्षण साधनांद्वारे चुकीची व पूर्वग्रहदुषित माहिती प्रदान करण्यात आल्यास शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा विपरित परिणाम होण्याची शक्यता निर्माण होणे, तसेच शिक्षण पध्दतीमध्ये AI प्रणालीच्या वापरामुळे विद्यार्थ्यांची इत्यंतभूत माहितीचा व्यवसायासाठी, निरीक्षणासाठी किंवा जाहिरातीसाठी गैरवापर केला जाण्याची निर्माण होणारी शक्यता, तसेच AI च्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांची स्वत:ची विचार करण्याची क्षमता कमी होवून त्यांच्या सर्वांगिण बौध्दिक विकासाला खीळ बसण्याची शक्यता, परिणामी शिक्षण पध्दतीमध्ये AI प्रणालीचा वापर करण्याच्या अनुषंगाने एक धोरण, नियम-अटी निश्चित करण्याची आवश्यकता, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका."

**आठ : सर्वश्री प्रविण दरेकर**, हेमंत पाटील, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री प्रसाद लाड, विक्रम काळे, सतिश चव्हाण, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री कृपाल तुमाने, श्रीकांत भारतीय, अमोल मिटकरी, किशोर दराडे, ॲड.निरंजन डावखरे,

अप्रकाशित

सर्वश्री किरण सरनाईक, पंकज भुजबळ, राजहंस सिंह, शिवाजीराव गर्जे, योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील, सदाशिव खोत, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, सर्वश्री अमरीशभाई पटेल, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"नागपूर कराराचे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊन नागपूरसह विदर्भाच्या विकासाला चालना देण्याकरिता विद्यमान शासन कटीबध्द असणे, नागपूर जवळील मिहानमध्ये सेझअंतर्गत पायाभूत सुविधा निर्माण झाल्याने बोईंगच्या एमआरओसह अनेक उद्योगांनी नागपूरात येण्यास स्वारस्य दाखविल्याचे निदर्शनास येणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय नागपूर विमानतळाचे अद्ययावतीकरण आणि विस्तारीकरण हा नागपूरच्या विकासाचा मैलाचा दगड ठरणार असणे, विस्तारित विमानतळाच्या माध्यमातून ९,००,००० टन क्षमतेच्या कार्गोची हाताळणी होणार असणे, परिणामी, नागपूर विमानतळ मध्य भारतातील गेम चेंजर म्हणून सिध्द होणार असणे, नवीन विमानतळ ३,००,००० स्वे. फूट क्षेत्रात बांधले जाणार असल्याने व सध्याच्या धावपट्टीच्या शेजारी आणखी ६० मीटर रुंद आणि ४ हजार मीटर लांबीची धावपट्टी बांधण्यात येणार असल्याने तेथे एकाच वेळी १०० विमाने उभी राहण्याचे प्रयोजन असणे, मोठ्या औद्योगिक टाऊनशीपला लागून असलेले कार्गो हब आणि मोठे विमानतळ ही रचना विदर्भातील भविष्याच्या विकासाचे द्योतक ठरणार असणे, विमानतळाच्या विस्तारामुळे येथून होणाऱ्या माल वाहतुकीची क्षमता वाढल्याने विदर्भातील सर्व उत्पादनांची निर्यात होण्यास गती मिळणार असणे व त्यामुळे सुमारे १ लाख लोकांना रोजगार उपलब्ध होणार असणे, रस्ते, रेल्वे, विमानतळ विकास यामुळे विदर्भ लॉजिस्टीक हब म्हणून विकसित होणार असणे, माहे जानेवारी, २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये, ६३ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी सुमारे १५ लाख ७२ हजार कोटी रुपये इतक्या गुंतवणूकीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्याने महाराष्ट्र हे थेट परकीय गुंतवणूकीसाठी पसंतीचे राज्य असल्याचे स्पष्ट झाले असणे, देशातील एकूण थेट परकीय गुंतवणूकीच्या २९टक्के गुंतवणूक राज्यात आली असणे, परिणामी, राज्यात १५ लाखांपेक्षा अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे, राज्य शासन आणि बजाज फिनसर्व्ह यांच्यात सुमारे ५ हजार कोटी रुपये गुंतवणूकीचा सामंजस्य करार करण्यात आल्याने ४० हजार रोजगारांची निर्मिती होणे अपेक्षित असणे, मुंबई महानगर विकास प्राधिकरणातील विकास केंद्राबाबत कैलिफोर्नियातील बर्कले युनिव्हर्सिटी समवेत सामंजस्य करार करण्यात येणे, सुक्ष्म, लघु आणि मध्यम

अग्रिम प्रत

उद्योगांच्याबाबतीत महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य राज्य ठरले असणे, राज्यात मुंबई, पुणे व छत्रपती संभाजीनगर येथे जी-२० च्या विविध बैठका यशस्वीरित्या आयोजित करण्यात आल्या असणे, औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्यातील विविध उद्योगांना सुमारे ६ हजार कोटी रुपये इतके गुंतवणूक प्रोत्साहन अनुदान वितरित करण्यात येणार असणे, राज्यातील औद्योगिकीकरणाला पाठबळ व प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुमारे ३,५०० एकर इतके औद्योगिक भूखंड वितरित करण्याचा निर्णय घेण्यात येणे, पुरवठा साखळीची कार्यक्षमता सुधारण्यासाठी आणि जागतिक दर्जाची व्यवसाय परिसंस्था निर्माण करण्यासाठी १० एकात्मिक औद्योगिक केंद्रे व एकात्मिक माल वाहतूक केंद्रे विकसित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असणे, सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये, बेरोजगार युवकांना उद्योगांशी जोडण्यासाठी व रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी राज्यात जिल्हा स्तरावर ६११ 'पंडीत दीनदयाल रोजगार मेळावे' आयोजित केले असणे, त्यायोगे १९ हजारांपेक्षा अधिक उमेदवारांना नोकऱ्या प्राप्त झाल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील जनतेचे आरोग्य सदृढ ठेऊन प्रत्येक नागरिकाला 'आरोग्यम् सुखसंपदा' उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने 'महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजना' व 'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' या एकत्रित योजनेंतर्गत लाखो रुग्णांवर शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या असणे, राज्यात ३० वर्षांवरील सर्व महिलांचे कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोतीबिंदू, कान, नाक, घसा व इतर आजारांचे निदान व उपचार याकरिता राज्य शासनातर्फे प्रति जिल्हा २ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असणे, राज्यात शुन्य ते अठरा वर्षांपर्यंतची बालके तसेच किशोरवयीन मुलां-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी 'जागरुक पालक, सदृढ बालक' हे अभियान राज्यभर राबविण्यात येणे, राज्यात ग्रामीण तसेच दुर्गम भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना प्रत्येक छोट्या आजारासाठी हॉस्पीटलमध्ये जाऊ लागू नये याकरिता 'हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या योजनेंतर्गत महाराष्ट्रात ७०० दवाखाने सुरु करण्यात येणे, राज्यात विविध महापालिका व जिल्हा परिषदेतील औषधे, वैद्यकीय उपकरणे खरेदीतील अनियमिततेला पायबंद घालण्यासाठी "महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण" स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यातील रस्ते, बंदरे, विमानतळ, रेल्वे, मेट्रो, वीज इ. पायाभुत सुविधा विकास क्षेत्रांसाठी निधी उभारणे आणि प्रकल्प राबविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली 'महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ' स्थापन करण्यात येणे, सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील

कामे या महामंडळामार्फत करण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नागपूर येथील महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीची इमारत, नागपूर जिल्हा न्यायालयाची विस्तारित इमारत, मुंबईतील माझगाव न्यायालयाची इमारत, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाची इमारत, जलभूषण बंगला, राजभवन इ. इमारतींचे बांधकाम अलीकडेच पूर्ण करण्यात येणे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व योजनांचे संनियंत्रण करण्यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम (PMIS) ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येणे, भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्याचे सहापदरी रुंदीकरण करण्यासाठी ५६१.८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, नाबार्ड-२८ अंतर्गत १,०३०.५२ कोटी रुपयांच्या ३८२ कामांना नाबार्ड करून मंजुरी प्राप्त झाली असणे व राज्य शासनाने देखील त्यास प्रशासकीय मान्यता दिली असणे, सर्व समाज घटकांना सोबत घेऊन, सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी व विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री सत्यजीत तांबे,** विक्रम काळे, किशोर दराडे, **वि.प.स.**

"महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेतंर्गत असलेली रुग्णालये राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये उपलब्ध करण्याबाबत" या विषयावरील श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स. यांचा दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ९ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक २३७५१ ला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील."

(२) **श्रीमती उमा खापरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत **वि.प.स.**

"राज्यातील धर्मादाय रुग्णालयांच्या मनमानी कारभाराबाबत" या विषयावरील ॲड. अनिल परब, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २३६१५ ला दिनांक २७ जून, २०२४ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील."

**विधान भवन,** **जितेंद्र भोळे**

मुंबई
दिनांक : १७ मार्च, २०२५.

सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

असुधारित प्रत